एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, लेबर कॅम्प, धारावी रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.

---

**महानिर्मिती जाहिरात क्र. ०९(OCT)/२०१६**

**सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) पदाची सरळसेवा भरती**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतील सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या **http://www.mahagenco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

१) महानिर्मिती कंपनीच्या महाराष्ट्रातील सर्व औष्णिक विद्युत केंद्रातील अनुशेष तसेच सामाजिक व समांतर आरक्षण त्याचप्रमाणे रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) यांची ४०० व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) यांची २५० पदे भरावयाची आहेत.

**सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.**

**श्रेणी :- सामान्य उमेदवार (महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी वगळून )**

| अभियांत्रिकी शाखा व समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१) इलेक्ट्रीकल शाखा** | १५ | ०८ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | ०२ | २२ | ५५ | **११४** |
| **महिला ३० %** | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | १६ | **३४** |
| **खेळाडू ५%** | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०५** |
| **सर्वसाधारण** | १० | ०३ | ०२ | ०२ | ०३ | ०१ | ०१ | १४ | ३६ | **७५** |
| | | | | | | | | | | |
| **२) मेकॅनिकल शाखा** | १२ | ०७ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १८ | ४६ | **९५** |
| **महिला ३० %** | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ | १४ | **२९** |
| **खेळाडू ५%** | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | **०५** |
| **सर्वसाधारण** | ०८ | ०४ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | १२ | ३० | **६१** |
| | | | | | | | | | | |
| **३) इलेक्ट्रॉनिक शाखा** | १० | ०५ | ०२ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १४ | ३६ | **७६** |
| **महिला ३० %** | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १० | **२३** |
| **खेळाडू ५%** | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | **०४** |
| **सर्वसाधारण** | ०६ | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०९ | २४ | **४९** |
| | | | | | | | | | | |
| **४) इन्स्ट्रूमेंटेशन शाखा** | ०८ | ०४ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ११ | २७ | **५७** |
| **महिला ३० %** | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ | ०८ | **१७** |
| **खेळाडू ५%** | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | **०३** |
| **सर्वसाधारण** | ०५ | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०७ | १८ | **३७** |
| | | | | | | | | | | |
| **५) पॉवर शाखा** | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | १८ | **३८** |
| **महिला ३० %** | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०५ | **११** |
| **खेळाडू ५%** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | **०२** |
| **सर्वसाधारण** | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०४ | १२ | **२५** |
| | | | | | | | | | | |
| **एकूण रिक्त पदे** | ५० | २७ | ११ | ०९ | १३ | ०८ | ०८ | ७२ | १८२ | **३८०** |

## श्रेणी :- महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी

| जात प्रवर्ग व समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण रिक्त जागा | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १० | **२०** |
| महिला ३० % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०३ | **०५** |
| खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०६ | **१४** |

कनिष्ठ अभियंता (**Junior Engineer**) रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

## श्रेणी :- सामान्य उमेदवार (महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी वगळून )

| अभियांत्रिकी शाखा व समांतर आरक्षण | अजा | अज | भज (ब) | भज (ड) | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) इलेक्ट्रीकल शाखा | ११ | ०३ | ०१ | ०१ | १० | ४५ | **७१** |
| महिला ३० % | ०३ | ०१ | ०० | ०० | ०३ | १४ | **२१** |
| माजी सैनिक १५% | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०७ | **०९** |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | **०४** |
| खेळाडू ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | **०४** |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| सर्वसाधारण | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १९ | **३०** |
| | | | | | | | |
| २) मेकॅनिकल शाखा | १० | ०३ | ०१ | ०१ | ०८ | ३७ | **६०** |
| महिला ३० % | ०३ | ०१ | ०० | ०० | ०३ | ११ | **१८** |
| माजी सैनिक १५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०६ | **०९** |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | **०३** |
| खेळाडू ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | **०३** |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| सर्वसाधारण | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १५ | **२६** |
| | | | | | | | |
| ३) इलेक्ट्रॉनिक शाखा | ०८ | ०२ | ०० | ०० | ०७ | ३० | **४७** |
| महिला ३० % | ०२ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०९ | **१४** |
| माजी सैनिक १५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०५ | **०७** |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०२** |
| खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | **०२** |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| सर्वसाधारण | ०४ | ०१ | ०० | ०० | ०३ | १३ | **२१** |
| | | | | | | | |
| ४) इन्स्ट्रूमेंटेशन शाखा | ०६ | ०२ | ०० | ०० | ०५ | २२ | **३५** |
| महिला ३० % | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०७ | **११** |
| माजी सैनिक १५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०३ | **०५** |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०२** |
| खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | **०२** |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| सर्वसाधारण | ०२ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०९ | **१४** |
| | | | | | | | |
| ५) पॉवर शाखा | ०४ | ०१ | ०० | ०० | ०४ | १५ | **२४** |
| महिला ३० % | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०५ | **०७** |
| माजी सैनिक १५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | **०४** |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| सर्वसाधारण | ०२ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०६ | **११** |
| | | | | | | | |
| एकूण रिक्त पदे | ३९ | ११ | ०२ | ०२ | ३४ | १४९ | **२३७** |

**श्रेणी :- महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी**

| जात प्रवर्ग व समांतर आरक्षण | अजा | अज | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण रिक्त जागा** | ०२ | ०१ | ०२ | ०८ | **१३** |
| **महिला ३० %** | ०१ | ०० | ०१ | ०२ | **०४** |
| **माजी सैनिक १५%** | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| **प्रकल्पग्रस्त ५%** | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| **खेळाडू ५%** | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| **भूकंपग्रस्त २%** | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| **सर्वसाधारण** | ०१ | ०१ | ०१ | ०५ | **०८** |

अपंग उमेदवारांकरीता आरक्षित पदे (केवळ एक पाय बाधीत व कर्णबधीर स्वरुपाचे अपंगत्व असलेले)

| पदाचे नाव | आरक्षित पदे |
|---|---|
| सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) | १२ |
| कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) | ०८ |

२) अ) सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव त्याचप्रमाणे लागू असलेली वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे.

| **श्रेणी :- सामान्य उमेदवारांकरीता (महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी वगळून )** | | |
|---|---|---|
| **पदाचे नाव व वेतनश्रेणी** | **शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** |
| सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) १९,११०-८४०-२३,३१०-८८५-४६,३२० | **इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक, इन्स्टूमेंटेशन व पॉवर या अभियांत्रिकी शाखेतील पदवी (Bachelor of Engineering)/ तंत्रज्ञान (Bachelor of Technology) आणि समकक्ष** | **अनुभवाची आवश्यकता नाही.** |
| | | |
| **श्रेणी :- महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी** | | |
| **पदाचे नाव व वेतनश्रेणी** | **शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** |
| सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) १९,११०-८४०-२३,३१०-८८५-४६,३२० | **इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक, इन्स्टूमेंटेशन,कॉम्प्युटर व पॉवर या अभियांत्रिकी शाखेतील पदवी (Bachelor of Engineering)/ तंत्रज्ञान (Bachelor of Technology) आणि समकक्ष** | **महानिर्मिती कंपनीच्या कार्यरत कर्मचाऱ्यास तांत्रिक संवर्गातील आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा ५ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक** |

२) ब) कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव त्याचप्रमाणे लागू असलेली वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे.

| **श्रेणी :- सामान्य उमेदवारांकरीता (महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी वगळून )** | | |
|---|---|---|
| **पदाचे नाव व वेतनश्रेणी** | **शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** |
| कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) १४.५००-६५०-१७,७५०-६७५-२४,५००-७१०-४०,१२० | **इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक, इन्स्टूमेंटेशन व पॉवर या अभियांत्रिकी शाखेतील पदवीका (Diploma of Engineering)/ तंत्रज्ञान (Diploma of Technology) आणि समकक्ष** | **अनुभवाची आवश्यकता नाही.** |
| | | |
| **श्रेणी :- महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी** | | |
| **पदाचे नाव व वेतनश्रेणी** | **शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** |
| कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) १४.५००-६५०-१७,७५०-६७५-२४,५००-७१०-४०,१२० | **इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक, इन्स्टूमेंटेशन,कॉम्प्युटर व पॉवर या अभियांत्रिकी शाखेतील पदवीका (Diploma of Engineering)/ तंत्रज्ञान (Diploma of Technology) आणि समकक्ष** | **महानिर्मिती कंपनीच्या कार्यरत कर्मचाऱ्यास तांत्रिक संवर्गातील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा ५ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक** |

३) **वयोमर्यादा : दिनांक ०७.११.२०१६** रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**टीप :** १) मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

२) अपंग उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.

४) प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकल्प/१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ दि.०३/०२/२००७ नुसार खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी व भूकंपग्रस्तांसाठी कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.

५) महानिर्मिती कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा सरसकट ५७ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**सर्वसाधारण अटी** :-

१) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे, आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत /आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

२) जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शैक्षणिक पात्रता पुर्ततेच्या अधीन राहूनच उमेदवारांच्या निवडीबाबत कार्यवाही पार पाडण्यात येईल.

३) शासकीय/निमशासकीय/तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत दिलेल्या सुचनेनुसार विहित मुदतीत अर्ज सादर करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या/संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.**

४) महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्येमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

**मागासवर्गाचे आरक्षणासंबंधी अटी / नियम:-**

१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे.
उपरोक्त शासन निर्णयान्वये आरक्षणासंबंधीच्या तरतुदी लागू होतील.

तसेच वरील अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग यांना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवाराने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी करण्याच्या दिनांकास सादर करणे आवश्यक राहील. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.

२) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **जात वैधता प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात वैधता समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोहोच सादर केल्यानंतरच **<u>तात्पुरत्या</u>** स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. **जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवारांची जबाबदारी राहील.**

३) **अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.**

४) मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल. सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) यांची ४०० व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरीता अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) यांची ४०० व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे जसे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, कायमस्वरुपी अपंग असल्याचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र,खेळाडू प्रमाणपत्र, माजी सैनिक कार्यमुक्त प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदपत्रे जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत कागदपत्रे सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही व अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

५)

**<u>समांतर आरक्षणासंबंधीचे अटी / नियम:-</u>**

१) शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही (अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील महिला वगळून).

२) अपंग प्रवर्गासाठी एक पाय बाधित व कर्णबधीर याकरीता एकूण ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा कमी अपंगत्व नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र.३६०३५/३/२००४ ईएसटीटी (आरईएस), दि.२९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७/०६/२००६ अनुसार निवडीस / नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. अपंग उमेदवारांजवळ कायमस्वरुपी अपंग असल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.

३) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नांव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) असणे आवश्यक आहे.

४) शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५% आरक्षण राहिल. **महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१.०१.१९८० नुसार विहित नमून्यात प्रकल्पग्रस्तांचे प्राधान्यक्रम दाखला (प्रपत्र) असणे अत्यावश्यक आहे.**

५) शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दि. २७/०८/२००९ मधील तरतुदीनुसार भूकंपग्रस्त व्यक्तींसाठी २ टक्के समांतर आरक्षण राहील.**भूकंपग्रस्त आरक्षणातंर्गत अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांजवळ विहित नमून्यात भूकंपग्रस्तांचे प्राधान्यक्रम दाखला (प्रपत्र) असणे अत्यावश्यक आहे.**

६) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रोधो.२००२/ प्र.क्र. ६८/ क्रीयुसे-२, दि.३०.०४.२००५ अनुसार ५% आरक्षण राहील. कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदाकरीता खेळाडू आरक्षणातंर्गत केवळ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम,द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) या पदाकरीता खेळाडू आरक्षणातंर्गत केवळ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम,द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण ,रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.खेळाडू आरक्षणातंर्गत निवड झालेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे ही सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांच्या पडताळणीकरीता वैध आहेत अथवा नाहीत याबाबतच्या पडताळणीकरीता संचालक , क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या कार्यालयास पाठविण्यात येतील व सदर कार्यालयाकडून उमेदवाराच्या खेळाडू प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच उमेदवार सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदाकरीता खेळ विषयक अर्हता पूर्ण करीत असल्यासच उमेदवारास नियुक्ती पत्र देण्याबाबतची पुढील कार्यवाही पार पाडण्यात येईल.

**महत्वाच्या सूचना :**

१) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आय-डी व मोबाईल नंबर भरती-प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवणे, ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी आहे. उमेदवाराचा ईमेल-आयडी व मोबाईल नंबर बंद झाल्यास अथवा बदलला गेल्यास उमेदवारास मेल अथवा संदेश प्राप्त न झाल्यास महानिर्मिती कंपनी जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) या संदर्भातील अधिक माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

३) अ) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे व अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने ती सिध्द करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा. अचूक अर्ज भरण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

ब) उमेदवाराने अर्जात अचुक माहिती भरणे ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. एकदा भरलेली माहिती उदा.जात, धर्म,प्रकल्पग्रस्त,खेळाडू,भुकंपग्रस्त,महिला आरक्षण, माजी सैनिक,अपंग इत्यादी बाबतीत भविष्यात कोणताही बदलासंबंधित अर्ज स्विकारला जाणार नाही किंवा तसा कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

५) ऑनलाईन अर्ज स्विकृत करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. परंतु एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल उमेदवारास करता येणार नाही व शेवटी भरलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी. अर्जाची प्रत स्वत:जवळ तयार ठेवावी व अंतिम निवडीपूर्व अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी मागितली जातील त्यावेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

६) ऑनलाईन पध्दतीने सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरीता अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत ही उमेदवारांनी सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांची पद भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत: जवळ बाळगणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. ऑनलाईन अर्जाची प्रत हरविल्यास, गहाळ झाल्यास त्यास महानिर्मिती कंपनी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

७) ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास आपली अडचण hrhelpdesk@mahagenco.in या ई-मेल आयडीवर नोंदवावी किंवा ०२२-४२०४०१८८ / ४२०४०२४० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**उमेदवारांना इतर महत्वाच्या सूचना :**

१) शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम तसेच महानिर्मिती कंपनीच्या सेवेतील कर्मचाऱ्याने सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरिता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचाऱ्याला सक्षम अधिकाऱ्याने वितरीत केलेले खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

२) पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व ऑनलाईन परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. **भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही, तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही.** उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

४) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

५) परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

६) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जातीप्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

७) **उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. मराठी भाषेचे ज्ञान असल्याबाबतचा पुरावा म्हणून उमेदवारांनी खालील प्रमाणपत्रे अंतिम निवड पूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.**

अ) माध्यमिक / शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रीक किंवा विद्यापीठीय उच्च परीक्षा संबंधी मराठी भाषा विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे दर्शविणारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाचे किंवा संविधीक विद्यापीठाचे प्रमाणपत्र.

ब) उमेदवार उत्तम रितीने मराठी भाषा वाचू , लिहू आणि बोलू शकतो अशा आशयाचे संविधीक विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील किंवा पदव्युत्तर संस्थेतील मराठी भाषा शिक्षकाने दिलेले आणि महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या प्राचार्यानी प्रतिस्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र.

८) **उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वतःच्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.**

९) अ) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग या मागासप्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.

ब) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.

१०) **अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून** इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना कामावर रुजू होण्यापूर्वीच सर्व कागदपत्रे प्रस्तावासह जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करुन ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबधित उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथा सदर उमेदवारांची महानिर्मिती कंपनीतील सेवा समाप्त करण्यात येईल.

११) ऑनलाईन परिक्षेतील गुणानुक्रमे निवडीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना कंपनीने मागणी केल्यानुसार कागदपत्रे तपासणीवेळी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, अनुभव, समांतर आरक्षणासंबंधी, डोमीसाईल, विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रती व सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरीता प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे.

१२) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्या सापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त जागा व आवश्यकतेनुसार महानिर्मिती कंपनीच्या विद्युत केंद्रात नेमणूका देण्यात येतील.

१३) सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१४) सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरीता अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे कागदपत्रे पडताळणी करणाच्या दिनांकास सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज स्विकृत (Submit) करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. तद्नंतर एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर उमेदवाराची कोणतीही दुरुस्ती विचारात घेतली जाणार नाही. सदर बाबतीत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**अर्ज करण्याची पध्दत :**

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती http://www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वर दर्शविलेल्या लिंकवर ऑन लाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. (Guidelines for online application are available on the link above.) त्यानुसार उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) उमेदवार परिक्षा शुल्क भरण्यासाठी Net Banking / क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड या सुविधा वापरुन परिक्षा शुल्क भरु शकतील. उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परिक्षा शुल्क उपरोक्त पध्दतीद्वारे भरावयाचे आहे. **अपंग आणि माजी सैनिक उमेदवारांकरीता सदर फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

| पदाचे नाव | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|
| सहाय्यक अभियंता (Assistant Enginer) | रु.८००/- | रु.६००/- |
| कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) | रु.५००/- | रु.३००/- |

३) विहित नमुन्यातील ऑन लाईन अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावर **दिनांक १७.१०.२०१६** पासून उपलब्ध राहील. सदर अर्ज स्विकारण्याची अंतिम **दिनांक ०७.११.२०१६** रोजी २३:५९ वाजेपर्यंतच राहील. उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

४) अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील व ती सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर दाखला, अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला, भुकंपग्रस्त दाखला, माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र, इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत कागदपत्रे पडताळणीकरीता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आल्यानंतर मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे.

६) अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याबाबतीत कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

७) शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचा-यांनी त्यांचे अर्जासोबत कार्यरत कार्यालयातून / नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वसांक्षाकीत केलेली ' ना हरकत प्रमाणपत्राची ' प्रत अर्जासोबत जोडावी.

**निवड पध्दती :**

१) जाहिरातीस अनुसरुन पात्र झालेल्या अर्जदार उमेदवाराची चाळणी करण्यासाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

२) **उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार** तसेच जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड सूची यादी तयार करण्यात येईल. सदरची निवडसूची कंपनीच्या संकेत स्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) उमेदवारांकडून मागणी केल्यानंतर सादर केलेल्या अर्जाची सविस्तर छाननी निवडसूची बनविते वेळी केली जाईल. अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्टयर्थ योग्य ते दस्तऐवज जमा करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

४) उमेदवाराने एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास आणि त्यामधील जातीचा प्रवर्ग व अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंदी रद्दबातल समजल्या जातील.

५) निवडसुची बनवितांना ज्या उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील ज्येष्ठताक्रम ठरविण्यात येईल.

६) **निवड झालेल्या उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारिरीक बाधित / व्यंगत्वाचे प्रमाण, माजी सैनिक, इत्यादी सिध्द करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. तसेच सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.**

७) दस्तऐवज सादर करण्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्तऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८) **सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) म्हणून निवड होणाऱ्या उमेदवारांना पदवीधर अभियांत्रिकी प्रशिक्षणार्थी तर कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) म्हणून निवड होणाऱ्या उमेदवारांना पदविका अभियांत्रिकी प्रशिक्षणार्थी म्हणून प्रथमतः ५२ आठवडयांचे प्राथमिक स्तरावरील प्रशिक्षण देण्यात येईल. सदर प्रशिक्षण काळात पदवीधर अभियांत्रिकी प्रशिक्षणार्थींना रु.२२,०००/- दरमहा तर पदविका अभियांत्रिकी प्रशिक्षणार्थींना रु.१८,०००/- दरमहा मानधन देण्यात येईल. निवड होणाऱ्या उमेदवारांना ५ वर्षे कंपनीची सेवा करण्याबाबतचे रु.१०,००,०००/- इतक्या रक्कमेचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.**

९) **सहाय्यक अभियंता (Assistant Engineer) व कनिष्ठ अभियंता (Junior Engineer) म्हणून निवड होणाऱ्या उमेदवारांची सेवा जेष्ठता ही त्यांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांचे ७५% मध्ये रुपांतर करुन व प्राथमिक स्तरावरील प्रशिक्षणात मिळालेल्या गुणांचे २५% मध्ये रुपांतर करुन एकूण १०० % पैकी मिळालेल्या गुणांच्या अनुषंगाने मुख्य अभियंता (तांत्रिक) विभागामार्फत निश्चित करण्यात येईल.**

**महत्वाच्या तारखा :**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक १७.१०.२०१६ ते दिनांक ०७.११.२०१६ |
| Net Banking द्वारे फी भरण्याचा कालावधी | दिनांक १७.१०.२०१६ ते दिनांक ०७.११.२०१६ |
| ऑनलाईन परिक्षेची तारीख | महानिर्मिती कंपनीच्या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल. |
| तक्रार असल्यास संपर्क क्रमांक | ०२२-४२०४०१८८ / ४२०४०२४० |
| ई-मेल आयडी | hrhelpdesk@mahagenco.in |

**ऑनलाईन अर्ज करण्याकरीता येथे Click करावे.**